# सातारा जिल्ह्यातील संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाची प्रगती

**संतोष मारूती भोसले**

अर्थशास्त्र विभाग, कला, वाणिज्य महाविद्यालय, नागठाणे, ता. जि. सातारा.

## 1. प्रस्तावना :

भारत हा नैसर्गिक विविधतेने नटलेला आणि समृद्ध देश आहे. भारतास खेड्यांचा देश म्हणून ओळखले जाते. आजमितीस भारतात 6.2 लक्ष खेडी असून भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी 72.22 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. भारताचे ग्रामीण स्वरूप पाहता देशाच्या आर्थिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रथम ग्रामीण भागाचा विकास साध्य करावा लागेल. महात्मा गांधीजींनी तर राष्ट्राचा विकास म्हणजेच ग्रामीण विकास होय, अशी ग्रामीण विकासाची व्याख्या केली आहे.[1]

ग्रामीण विकास हे केंद्रबिंदू मानून भारतात स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण विकासाचे विविध कार्यक्रम, योजना राबविण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये स्वच्छता व आरोग्यविषयक संबंधी व सुविधांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. अस्वच्छतेमुळे व्यक्तिगत आरोग्य बिघडते आणि कुटुंबाचेही आरोग्य बिघडते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या पाहणीनुसार सुमारे 80 टक्के रोग दूषित पाणी आणि अस्वच्छता यामुळे होतात. ग्रामीण भागात दूषित पाण्यामुळे, अस्वच्छ परिसरामुळे तसेच वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेअभावी कावीळ, पोलिओ, अतिसार, हागवण, पटकी, विषमज्वर, गॅस्ट्रो इत्यादीसारखे रोग होऊ नयेत म्हणून भारत सरकारने सन 1983 साली 'केंद्रिय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम' सुरू केला. पण त्यातील काही त्रुटीमुळे त्यामध्ये सुधारणा करण्याची गरज होती म्हणून केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाची पुनर्रचना करण्यात आली आणि त्याठिकाणी मागणी आधारीत लोकसहभागीय तत्वावर 'संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान' ही योजना सुरू करण्यात आली.[2]

महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचविण्यासाठी वैयक्तिक आरोग्य, घराची स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छता, पिण्यासाठी सुरक्षित पाणी, सांडपाणी व कचऱ्याची विल्हेवाट, मलमूत्राचे विसर्जन, वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांचा वापर व नियमित स्वच्छता अशा अनेक गोष्टींसाठी महाराष्ट्रात संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान राबविले जात आहे.

सातारा जिल्ह्यातील 1496 गावांपैकी 1433 गावांना संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियाना अंतर्गत 'निर्मल ग्राम पुरस्कार' प्राप्त झाला आहे. महाबळेश्वर पंचायत समितीला राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते 'महाराष्ट्रातील पहिली निर्मल पंचायत समिती' म्हणून गौरविण्यात आले आहे. त्यामुळे सातारा जिल्ह्याने संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानात महाराष्ट्रातच नव्हे तर पूर्ण भारतात बाजी मारली आहे.

संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानामुळे फक्त गावेच नव्हे तर लोकांची मनेही निर्मल झाली आहेत. जिल्ह्यातील बहुसंख्य ग्रामपंचायतीच्या निवडणुका बिनविरोध होत आहेत. जिल्ह्यातील काही गावे आता ग्रामविकासावरील अभ्यासकांसाठी 'अभ्यास

केंद्रे' ठरत आहेत. या गावांच्या अभ्यासासाठी आंध्र प्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यांबरोबरच बांगला देश, इंडोनेशिया या देशातील अभ्यासकही भेटी देत आहेत.[3]

**2. संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाची उद्दिष्टये :**

भारतात राबविण्यात येत असलेल्या संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे ठरविण्यात आलेली आहेत.

अ) देशाच्या ग्रामीण भागात लोकांच्या जीवनमानाची गुणवत्ता उंचावणे.

ब) देशाच्या ग्रामीण भागात स्वच्छता कार्यक्रमाची व्यापकता वाढविणे.

क) जाणीव, जागृती आणि आरोग्यविषयक शिक्षण यातून स्वच्छतेच्या सुविधांची मागणी निर्माण करणे.

ड) देशाच्या ग्रामीण भागातील शाळा आणि अंगणवाड्यातून स्वच्छतेच्या सुविधा निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक शिक्षण देणे व स्वच्छतेच्या सवयी लावणे.

इ) स्वच्छतेच्या कमी खर्चाच्या आणि योग्य तंत्रांना प्रोत्साहन देणे.

ई) पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे अन्नपदार्थांचे प्रदूषण कमी करण्यासाठी उघड्यावर मलमूत्र विसर्जन करण्याच्या पद्धतीचे निर्मूलन करणे.[4]

**3. संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाचे स्वरूप :**

संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी प्रकल्प तत्वावर केली जाते. प्रकल्पाचा प्रस्ताव जिल्ह्याकडून तयार केला जातो. त्याची तपासणी राज्य शासन करते आणि नंतर तो केंद्र शासनाला सादर केला जातो. जिल्हा हा एक घटक आहे. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनी निवडक जिल्ह्यांसाठी केंद्र शासनाकडे अर्थसहाय्य मागतात. या अभियानाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने होते. प्राथमिक माहिती शिक्षण आणि प्रसारासाठी आवश्यक रक्कम उपलब्ध करून दिली जाते. कामाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होताना आवश्यकता पूर्ण केल्या जातात. त्याप्रमाणे एकेकटी कुटुंबे घरगुती वापराच्या शौचालयाच्या यादीतून योग्य ती निवड करतात. निवड यादीतील उपलब्ध तंत्राच्या लवचिकतेमुळे गरीब कुटुंबांना त्यांच्या गरजेप्रमाणे व आर्थिक कुवतीप्रमाणे नंतरच्या सुधारणांसाठी संधी मिळते.

संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियाना अंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकांकरिता किंवा अपंगांसाठी वैयक्तिक शौचालये बांधून दिली जातात. यामध्ये केंद्र सरकार 60 टक्के, राज्य सरकार 20 टक्के आणि लाभार्थी 20 टक्के खर्च करीत आहेत. दारिद्र्य रेषेवरील लोकांना शौचालय बांधण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. त्यांना शौचालय बांधण्यासाठी उद्युक्त केले जाते. या अभियाना अंतर्गत ग्रामीण भागात सार्वजनिक शौचालये बांधली जातात. यामध्ये केंद्र सरकार 60 टक्के, राज्य सरकार 30 टक्के आणि लाभार्थी 10 टक्के खर्च करीत आहेत. ग्रामीण भागात शालेय आणि अंगणवाडीसाठी शौचालये बांधली जातात. यामध्ये केंद्र सरकार 70 टक्के, राज्य सरकार 30 टक्के खर्च करीत आहे. या अभियाना अंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन यासाठी केंद्र सरकार 60 टक्के, राज्य सरकार 20 टक्के आणि लाभार्थी 20 टक्के खर्च करीत आहेत.[5]

**4. भारतातील संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाची प्रगती :**

संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान भारतातील 374 जिल्ह्यामध्ये सन 1999 पासून राबविले जात आहे. माहे नोव्हेंबर 2010 अखेर भारतामध्ये संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत शौचालयासाठी लागणाऱ्या साहित्याचे उत्पादन करण्यासाठी 3091

एवढी उत्पादन केंद्रे निर्माण केली असून या साहित्याची साठवण आणि विक्री करण्यासाठी 5308 एवढी ग्रामीण सुविधा केंद्रे निर्माण केली आहेत. या अभियाना अंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकांकरिता 3,89,68,935 एवढी वैयक्तिक शौचालये बांधून दिली आहेत. तसेच सार्वजनिक शौचालये 20,046, शालेय शौचालये 10,42,460 आणि अंगणवाडीकरीता अंगणवाडी शौचालये 3,50,609 एवढी बांधून दिली आहेत. संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत ग्रामीण भागासाठी माहे नोव्हेंबर 2010 अखेर 8,54,880.46 लाख रुपये खर्च झाले असून यामध्ये 30 राज्यांनी मिळून केलेला एकूण खर्चाचा वाटा 2,57,742.20 लाख रुपये, केंद्र सरकारने केलेला एकूण खर्चाचा हिस्सा 4,85,213.30 लाख रुपये आणि लाभार्थींनी केलेला एकूण खर्चाचा हिस्सा 1,11,924.97 लाख रुपये एवढा आहे.[6]

**5. महाराष्ट्रातील संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाची प्रगती :**

संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान महाराष्ट्रातील 33 जिल्ह्यांमध्ये राबविले जात आहे. गावकऱ्यांच्या समूह निर्णय शक्तीला चालना देवून गाव परिसर 100 टक्के हागणदारी मुक्त करण्यासाठी 'हागणदारी मुक्त गाव' हा अभिनव प्रयोग राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे.[7] संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियाना अंतर्गत शौचालयासाठी लागणाऱ्या साहित्याचे उत्पादन करण्यासाठी महाराष्ट्रात माहे नोव्हेंबर 2010 अखेर 48 उत्पादन केंद्रे निर्माण केली असून या साहित्याची साठवण आणि विक्री करण्यासाठी 1507 एवढी ग्रामीण सुविधा केंद्रे निर्माण केली आहेत. या अभियानाअंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकांकरिता राज्य सरकारने 2,23,8701 एवढी वैयक्तिक शौचालये बांधून दिली आहेत. तसेच सार्वजनिक शौचालये 4,485, शालेय शौचालये 84,467, अंगणवाडी शौचालये 56,813 बांधून दिली आहेत.

माहे नोव्हेंबर 2010 अखेर संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाअंतर्गत राज्यातील ग्रामीण भागासाठी 60,252.09 लाख रुपये खर्च झाले असून त्यामध्ये केंद्र शासनाचा खर्च 3,76,636.02 लाख रुपये, राज्यशासनाचा खर्च 17,001.16 लाख रुपये आणि लाभार्थींनी केलेला एकूण खर्चाचा हिस्सा 5,614.91 लाख रुपये एवढा आहे.[8]

**6. सातारा जिल्ह्यातील संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाची प्रगती :**

महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात वसलेल्या सातारा जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ 10475 कि. मी. असून जिल्ह्यात आशिया खंडामध्ये सर्वात मोठे असलेले वीज निर्मिती केंद्र पाटण तालुक्यात कोयनानगर येथे आहे. सातारा जिल्ह्यात सातारा, वाई, खंडाळा, कोरेगांव, फलटण, माण, खटाव, कराड, पाटण, जावली, महाबळेश्वर असे एकूण 11 तालुके असून जिल्ह्यात 1496 खेडी आहेत. जिल्ह्याची एकूण लोकसंख्या सन 2001 च्या शिरगणतीनुसार 27,96,906 असून त्यामध्ये पुरुषांची संख्या 14,02,301 आणि स्त्रियांची संख्या 13,94,605 एवढी आहे.[9]

सातारा जिल्ह्यातील संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाची प्रगती आजमाविण्यासाठी जिल्ह्यातील अकरा तालुक्यातील सर्व्हेक्षित 11 गावांमधील निवडलेले 196 कुटुंबप्रमुख, 18 शाळांतील मुख्याध्यापक, 22 अंगणवाडी सेविका आणि 11 ग्रामसेवकांशी मुलाखत, त्यांच्याशी केलेली चर्चा व सखोल निरीक्षणाचा अवलंब करून सुसंवाद साधला. हा सुसंवाद साधताना स्वच्छता व आरोग्यविषयक सवयी व सुविधा, पायाभूत इतर सेवा व सुविधा आणि इतर महत्त्वपूर्ण घटकांबाबत सर्व्हेक्षण केले. सर्व्हेक्षण करीत असताना प्रतिसादकांनी दिलेल्या माहितीवरून आणि जिल्हा परिषद सातारा येथील स्वच्छता विभागातील पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीवरून सातारा जिल्ह्यातील संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाची प्रगती स्पष्ट करता येईल व त्यावरून काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष विषद करता येतील.

सन 2003-04 पासून सातारा जिल्ह्यातील सर्वच खेड्यात म्हणजेच 1496 खेड्यात संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान सुरू झाले. या अभियानाअंतर्गत सातारा जिल्ह्यातील माहे नोव्हेंबर 2012 अखेर दारिद्र्य रेषेखालील लोकांकरीता 71,679 एवढ्या वैयक्तिक शौचालयांच्या बांधकामासाठी 708.97 लाख रुपये खर्च केले आहेत. 4878 एवढ्या शालेय शौचालयांच्या बांधकामासाठी 903.65 लाख रुपये खर्च केले आहेत. 793 सार्वजनिक शौचालयांच्या बांधकामासाठी 501.66 लाख रुपये खर्च केले आहेत तर 3576 अंगणवाडी शौचालयांच्या बांधकामासाठी 224.57 लाख रुपये खर्च केले आहेत. तसेच शौचालयासाठी लागणाऱ्या साहित्याची साठवण आणि विक्री करण्यासाठी जिल्ह्यात 49 ग्रामीण सुविधा केंद्रे निर्माण केली आहेत.

संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाअंतर्गत सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागासाठी माहे नोव्हेंबर 2012 अखेर केंद्र सरकारने 1917.89 लाख रुपये, राज्य सरकारने 833.27 लाख रुपये आणि लाभार्थींनी 190.49 लाख रुपये असे एकूण 2941.65 लाख रुपये खर्च केले आहेत.[10]

**7. सातारा जिल्ह्यातील निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींची संख्या व प्राप्त निधी :**

सातारा जिल्ह्यातील वर्षनिहाय निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींची संख्या व एकूण निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त निधीबाबत माहिती खालील कोष्टकात दर्शविली आहे.

**कोष्टक क्रमांक 1.1**

**सातारा जिल्ह्यातील वर्षनिहाय निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींची संख्या व एकूण निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त निधी**

**(सन 2004-05 ते सन 2009-10)**

| अ. क्र. | तालुका | ग्राम पंचायतींची संख्या | निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींची वर्षनिहाय संख्या | | | | | | एकूण | एकूण निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त निधी | शिल्लक ग्राम पंचायत संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 2004-2005 | 2005-2006 | 2006-2007 | 2007-2008 | 2008-2009 | 2009-2010 | | | |
| 1 | सातारा | 193 | 0 | 8 | 22 | 49 | 99 | 3 | 181 | 153.30 | 12 |
| 2 | कोरेगांव | 142 | 1 | 9 | 12 | 37 | 65 | 9 | 133 | 123.50 | 9 |
| 3 | खटाव | 132 | 0 | 3 | 7 | 31 | 62 | 24 | 127 | 140.50 | 5 |
| 4 | माण | 96 | 0 | 2 | 9 | 29 | 26 | 12 | 78 | 68.50 | 18 |
| 5 | फलटण | 127 | 0 | 11 | 27 | 68 | 21 | 0 | 127 | 171.50 | 0 |
| 6 | वाई | 99 | 0 | 9 | 10 | 26 | 54 | 0 | 99 | 97.00 | 0 |
| 7 | खंडाळा | 65 | 0 | 3 | 8 | 54 | 0 | 0 | 65 | 82.00 | 0 |
| 8 | जावली | 126 | 3 | 12 | 45 | 65 | 1 | 0 | 126 | 108.50 | 0 |
| 9 | म.श्वर | 79 | 2 | 38 | 14 | 25 | 0 | 0 | 79 | 98.00 | 0 |
| 10 | कराड | 198 | 0 | 9 | 17 | 45 | 88 | 25 | 184 | 214.00 | 14 |
| 11 | पाटण | 239 | 0 | 5 | 15 | 73 | 112 | 29 | 234 | 189.50 | 5 |
| | एकूण | 1496 | 6 | 109 | 186 | 502 | 528 | 102 | 1433 | 1456.30 | 63 |

संदर्भ : जिल्हा परिषद सातारा (ग्राम स्वच्छता विभाग)

कोष्टकावरून असे दिसून येते की, सन 2004-05 ते सन 2009-10 या कालावधीत संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियाना अंतर्गत सातारा जिल्ह्यातील 11 तालुक्यातील 1496 ग्रामपंचायतींपैकी 1433 ग्रामपंचायतींना निर्मल ग्राम पुरस्कार मिळालेला असून एकूण पुरस्कार निधी 1456.30 लाख रुपये एवढा मिळालेला आहे. या अभियानाच्या सुरुवातीच्या कालखंडात निर्मल

ग्राम पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींची संख्या कमी दिसत असली तरी सन 2006-07 मध्ये सर्वात जास्त ग्रामपंचायतींना निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त झाला आहे. उर्वरीत 63 ग्रामपंचायती निर्मल होण्याचा मार्गावर आहेत.[11]

संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानामुळे सातारा जिल्ह्यातील ग्रामीण जनतेला वैयक्तिक आरोग्य, घराची स्वच्छता, पिण्यासाठी स्वच्छ पाणी, कचऱ्याची व सांडपाण्याची विल्हेवाट, मलमूत्राचे विसर्जन, शौचालयाचा वापर, सार्वजनिक स्वच्छता इत्यादींचे महत्त्व पटले आहे. यामुळे सातारा जिल्ह्यातील ग्रामीण जनता अधिक आरोग्यदायी जीवन जगत आहे. मागणी आधारित लोकसहभागीय तत्वावर आधारित असणाऱ्या या अभियानामुळे ग्रामीण जनता हेवेदावे विसरून एकत्रित नांदू लागली आहे. बहुसंख्य निर्मल गावांमध्ये गॅस्ट्रो, कावीळ, हिवताप इत्यादी अस्वच्छतेमुळे होणाऱ्या रोगांच्या रुग्णसंख्येत प्रचंड घट झाली आहे. ही रुग्णसंख्या 50 वरुन 5 ते 6 इतकी घटली आहे. पूर्वी 4 डॉक्टरांची प्रॅक्टिस चालणाऱ्या गावात आज एकही डॉक्टर नाही अशी परिस्थिती सातारा जिल्ह्यात दिसून येत आहे.[12]

**8. निष्कर्ष :**

सातारा जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाचे सर्व्हेक्षण केले असता पुढील प्रमाणे निष्कर्ष महत्वाचे ठरतात.

1. देशातील ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील नेमकी कुटुंबसंख्या शोधून काढण्यात शासनाला फारसे यश मिळाले नसल्याचे दिसून येते.
2. महाराष्ट्रामध्ये पुरुषप्रधान संस्कृतीचा अधिक प्रभाव असल्यामुळे बहुसंख्य महिला उत्स्फूर्तपणे संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानात सहभागी झाल्या नाहीत.
3. महाराष्ट्र राज्य राजकीयदृष्ट्या जागरूक असल्यामुळे पक्षीय संवेदना तीव्र असल्यामुळे संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियाना अंतर्गत स्वच्छता व आरोग्यविषयक उपक्रम ग्राम पातळीवर राबविताना अनेक वादविवाद निर्माण झाले. त्यामुळे एकमुखी सहकार्य मिळाले नाही.
4. सातारा जिल्ह्यातील बहुसंख्य गावात उन्हाळ्यात पाण्याची टंचाई असल्यामुळे बहुसंख्य कुटुंबांना पिण्याचे पाणी शुद्ध व पुरेसे मिळत नाही. आणि शौचविधीसाठी अनेक कुटुंबांना वैयक्तिक किंवा सार्वजनिक शौचालयांचा पाण्याच्या टंचाईमुळे वापर करता येत नसल्यामुळे उघड्यावर जावे लागत आहे.
5. जिल्ह्यातील काही कुटुंबांकडे स्वत:चे शौचालय बांधण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्यामुळे तर काही कुटुंबांकडे पुरेसा पैसा उपलब्ध नसल्यामुळे त्यांना वैयक्तिक शौचालय बांधता आले नाही.
6. जिल्ह्यातील काही कुटुंबांची शौचालयाचा वापर करण्याची मानसिकता नसल्यामुळे ही कुटुंबे शौचविधीसाठी उघड्यावर जातात.
7. जिल्ह्यामधील सार्वजनिक शौचालयांची नियमित स्वच्छता व देखभाल केली जात नसल्यामुळे अनेक कुटुंबांना शौचविधीसाठी उघड्यावर जावे लागत आहे.

8. सातारा जिल्ह्यातील वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम करण्यासाठी कुटुंबांना शासनाची मिळणारी प्रोत्साहन अनुदान रक्कम फारच कमी मिळत असून तीही वेळेवर मिळत नाही.

9. जिल्ह्यातील बहुसंख्य मोठ्या गावात पुरेशी सार्वजनिक जागा आणि निधी उपलब्ध नसल्यामुळे त्या गावातील सांडपाण्याचे व घनकचऱ्याचे नियोजन व व्यवस्थापन करता आले नाही. त्यामुळे अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

10. जिल्ह्यातील बहुसंख्य प्राथमिक शाळा व अंगणवाडीमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र शौचालये व स्वच्छतागृह (मुतारी) सुविधा नसल्यामुळे या शिक्षकांना मुलांच्या शौचालयाचा व स्वच्छतागृहांचा (मुताऱ्या) वापर करावा लागत आहे.

11. सातारा जिल्ह्यातील गावांमध्ये अंतर्गत असणारे राजकारण आणि विशिष्ट घराण्यांची परंपरागत गावात चालत आलेली सत्ता त्यामुळे गावातील बहुसंख्य कुटुंबांकडून प्रशासनाने राबविलेल्या संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाता अपेक्षित सहकार्य मिळाले नाही.

12. सातारा जिल्ह्यातील एकाहून अधिक गावांचा कार्यभार असलेल्या ग्रामसेवकांच्या कार्यक्षमतेवर अनिष्ट परिणाम होत आहे.

13. जिल्ह्यातील महिला सरपंच व दलित सरपंचांना ग्रामविकासाच्या कामांमध्ये नागरिकांचे एकमुखी सहकार्य मिळत नाही.

14. जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींना अपुरे उत्पन्न, वाढती थकबाकी व तिच्या वसुलीत अडचणी, शासकीय अनुदान मिळण्यात विलंब इत्यादींचा सतत सामना करावा लागत असल्यामुळे या ग्रामपंचायती सुरूवातीला कोणत्याच शासकीय योजनेत सामील होण्यास उत्सुक नसतात.

15. संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान राबविल्यानंतरच्या काळात ग्रामविकासाच्या कामामध्ये सातारा जिल्ह्यामध्ये मोठ्या गावातील नागरिकांचा सहभाग फारसा वाढला नाही.

16. संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान ज्या कालावधीत राबविण्यात आले तेवढ्याच कालावधीपुरती स्वच्छता जिल्ह्यातील बहुसंख्य गावात होती.

17. सातारा जिल्ह्यातील गावांमध्ये वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता कायम टिकविण्यासाठी संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानातील स्वच्छता व आरोग्यविषयक उपक्रम नव्याने व नियमितपणे राबविणे आवश्यक आहे.

18. सातारा जिल्ह्यातील शाळा व अंगणवाडीतील शौचालये, स्वच्छतागृह (मुताऱ्या), परिसराची स्वच्छता, वर्गांची स्वच्छता मुलांकडून करवून न घेता त्यासाठी स्वतंत्र कर्मचाऱ्याची नेमणूक करणे आवश्यक आहे.

19. कोणत्याही योजना राबविताना शासनाने लोकसहभागाला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

20. देशातील प्रत्येक गाव संपूर्ण स्वच्छ आणि निर्मल झाल्याशिवाय त्या गावाला 'निर्मल ग्राम पुरस्कार' दिला जाऊ नये.

**संदर्भ सूची**


1. भारत सरकार, 'केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम', (संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान), पेयजल आपूर्ति विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय, 2004, पान नं.2
2. कित्ता, पान नं. 3
3. डॉ. पाटील जगदीश (मुख्य संपादक व प्रकाशक, मुख्य कार्यकारी अधिकारी), 'निर्मल', कल्याणी कॉर्पोरेशन, सातारा, 2006, पान नं. 16 व 17
4. भारत सरकार, 'केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम', (संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान), पेयजल आपूर्ति विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय, 2004, पान नं. 8
5. कित्ता, पान नं. 9
6. www unicef . org
7. महाराष्ट्र शासन, 'स्वच्छतेतून समृद्धीकडे', पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई, 2008, पान नं. 3
8. www unicef . org
9. जिल्हा उद्योग केंद्र, सातारा
10. www unicef . org
11. जिल्हा परिषद, सातारा (ग्राम स्वच्छता विभाग).
12. डॉ. पाटील जगदीश (मुख्य संपादक व प्रकाशक, मुख्य कार्यकारी अधिकारी), 'निर्मल', कल्याणी कॉर्पोरेशन, सातारा, 2006, पान नं. 16
13. निष्कर्ष - मुलाखत, निरीक्षण (सर्व्हेक्षण)